**-: प्रेसनोट दिनांक- २०/०१/२०२५ :-**

**आरोपी खाजगी इसम १) अजित वसंतराव पाटोळे,वय ४९ वर्षे डॉक्टर ,स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज,रा.२३४४ साधना हायस्कुलजवळ,संभाजीनगर गडहिंग्लज,ता.गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर,२) इंद्रजित शिवाजीराव पाटोळे, वय ४८,प्रशासन स्वराज्य हॉस्पिटल,गडहिंग्लज,रा.मिसाळ चाळ,आझाद रोड,गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर यांनी लाचेची मागणी करून स्विकारलेबाबत.**

---

यातील तक्रारदार यांचा मित्र चक्कर येवुन पडल्याने त्यांचे डावा खुबा फॅक्चर झाला असल्याने खुब्याचे ऑपरेशन महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन होत असल्याने त्याबाबत स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज येथे चौकशी करून ऑपरेशन करीता ॲडमीट केले व त्याबाबतची आवश्यक कागदपत्रे सादर केली स्वराज्य हॉस्पिटलचे डॉक्टर अजित पाटोळे व तेथील प्रशासक इंद्रजीत पाटोळे यांनी तक्रारदार यांचे खुब्याचे ऑपरेशन महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन करून देवुन शासकिय योजनेचा लाभ मिळवुन देण्याच्या हेतुने २०,०००/-रु मागणी करून त्यातील १०,०००/-रु ऑपरेशन पुर्वी स्विकारून उर्वरीत १०,०००/-मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे दिनांक १८.०१.२०२४ रोजी पडताळणी केली असता त्यामध्ये इंद्रजीत पाटोळे यांनी तक्रारदार यांचे मित्राचे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन डावे खुब्याचे ऑपरेशन करून शासनाचा लाभ मिळवुन देण्याच्या हेतुने यापुर्वी १०,०००/-रु स्विकारल्याचे व त्यानंतर ऑपरेशन झाले असल्याचे सांगुन उर्वरीत १०,०००/-रु मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच दिनांक २०.१२.२०२४ रोजीच्या पडताळणीमध्ये डॉक्टर अजित पाटोळे यांनी तक्रारदार यांचे मित्राचे ऑपरेशन महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन मोफत झाल्याचे मान्य करून तक्रारदार यांचेकडुन १०,०००/-रु यापुर्वी स्विकारल्याचे मान्य करून उर्वरीत १०,०००/-रु मागणी करून तडजोडी अंती ८,०००/-रु ची मागणी करून ते इंद्रजित पाटोळे यांचेकडे देण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज येथे पंच साक्षीदार यांच्या समक्ष तक्रारदार यांचेकडुन इंद्रजित पाटोळे यांनी ८०००/- रुपये लाच रक्कम स्विकाल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे सदरबाबत **१) अजित वसंतराव पाटोळे,वय ४९ वर्षे डॉक्टर ,स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज,रा.२३४४ साधना हायस्कुलजवळ,संभाजीनगर गडहिंग्लज,ता.गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर,२) इंद्रजित शिवाजीराव पाटोळे, वय ४८,प्रशासन स्वराज्य हॉस्पिटल,गडहिंग्लज,रा.मिसाळ चाळ,आझाद रोड,गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर** यांचेविरुध्द गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरु आहे.

. सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती शीतज जानवे, अपर पोलीस अधीक्षक,तथा अतिरीक्त पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. कोल्हापूर मार्गदर्शनानुसार बापू साळुंके, पोलीस निरीक्षक व पथक ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७, कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.